# १०. फॅशन डिझाईनिंग

**सांगा पाहू!**

- *शो रूममध्ये किंवा फॅशन शोमध्ये प्रदर्शित केलेले कपडे कसे बनतात याबद्दल आपण कधी विचार केला आहे का ?*
- *रेडिमेड कपड्यांमध्ये एवढी विविधता निर्माण होण्यास कोण जबाबदार आहे ?*
- *कपडे डिझाइन करण्यासाठी आवश्यक सर्जनशीलता आवश्यक आहे. असे आपल्याला वाटते का ?*
- *आपण फॅशन डिझायनिंग बद्दल अधिक जाणून घेऊ इच्छिता का ?* डिझायनिंगच्या अफाट जगाची एक झलक दर्शविणे हे या घटकाच्या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे.

या पाठामुळे आपल्याला फॅशन बनविण्यास आणि डिझाइन करण्यात समाविष्ट असलेल्या गोष्टींची अंदाजे रूपरेषाची माहिती होईल.

## १०.१ परिचय

ऑक्सफोर्ड इंग्लिश डिक्शनरी (२००९) मध्ये फॅशनची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे –

***फॅशन म्हणजे विशिष्ट वेळी आणि विशिष्ट ठिकाणी काही ठराविक लोकांनी सुरू केलेली आणि त्यानंतर बऱ्याच लोकांनी अवलंबलेली कपड्यांची लोकप्रिय शैली.***

***परिधान करण्याचे कपडे व त्याबरोबर वापरण्यात येणाऱ्या अन्य वस्तू(ॲक्सेसरीज) यामध्ये डिझाईन, सौंदर्य आणि कलात्मकता निर्माण करणे म्हणजे फॅशन डिझाइनिंग.*** यावर सांस्कृतिक व सामाजिक वृत्तींचा परिणाम होतो आणि वेळ व ठिकाणानुसार त्यात बदल होत राहातो. याला फार मोठे सामाजिक महत्त्व आहे. मानवी मनावर याचा मोठा परिणाम होतो.

फॅशन डिझायनर असे कपडे तयार करण्याचा प्रयत्न करतात की जे कार्यानुरुप योग्य व कलात्मक असतात. कपडे कोण घालणार आहे व कोणत्या परिस्थितीत घालणार आहे, याचा विचार फॅशन डिझायनर करतात.

**फॅशनचे प्रकार :** फॅशन डिझायनरने तयार केलेल्या कपड्यांचे तीन प्रकार असतात :

अ. **हॉटे कॉचर :** हा फ्रेंच शब्द आहे. जो आघाडीच्या फॅशन हाऊसेसद्वारे उत्पादित महागड्या, फॅशनेबल कपड्यांचे वर्णन करतो. हे कपडे विशिष्ट ग्राहकांसाठी तयार केले जातात. कपडे कसे दिसतात व अंगावर कसे बसतात, याला महत्व दिले जाते. कपड्यांचा तपशील व नीटनेटकेपणा याकडे काळजीपूर्वक लक्ष दिले जाते.

**इतिहासात डोकावताना !**

१९ व्या शतकात फॅशन डिझाइनिंगची सुरुवात झाली असे मानले जाते. **चार्ल्स फ्रेडरिक वर्थ** हा पहिला फॅशन डिझायनर आहे. त्याने स्वतः तयार केलेल्या कपड्यांमध्ये त्याचे लेबल शिवून लावले होते. त्याने पॅरिसमध्ये पहिले फॅशन हाऊस स्थापन केले. तो इतका यशस्वी झाला की ग्राहकांना त्यांनी काय घालावे हे तो अधिकार वाणीने सांगत असे.

**तुम्हाला माहित असायला हवे!**

फॅशन आज एक जागतिक उद्योग आहे. फ्रान्स, इटली, यू.के.,अमेरिका, जपान, जर्मनी आणि बेल्जियम या सात देशांची फॅशनमध्ये आंतरराष्ट्रीय ख्याती आहे.

**ब. रेडी-टू-वेअर (प्रेट-अ-पोर्टर):** परिधान करण्यास सज्ज. हे कपडे हॉटे कॉचर व मास मार्केट या दोन प्रकारांच्या मधला प्रकार आहे. हे कपडे वैयक्तीक ग्राहकांसाठी बनविलेले नसतात. परंतु कापडाची निवड व कापड कापताना खूप काळजी घेतली जाते. कपडे कमी प्रमाणात तयार केले जातात. जेणेकरून ते खास व किंमती कपडे म्हणून ओळखले जातात.

**क. मास मार्केट :** सामान्य लोकांसाठी तयार केलेल्या रेडी-टू-वेअर कपड्यांचा यात समावेश होतो. या प्रकारात डिझायनर फॅशन मधील प्रसिद्ध व्यक्तींनी स्थापित केलेले ट्रेंड वापरतात. खर्च कमी करण्यासाठी स्वस्त कापड आणि सोपी तंत्रे वापरली जातात. हे मोठ्या प्रमाणात उत्पादित केले जाते आणि खुल्या बाजारात उपलब्ध केले जाते. हे कपडे एकाच डिझाईनच्या विविध प्रमाणित आकारमानात(स्टँडर्ड साईज) अनेक प्रतीत उपलब्ध असतात. सध्याचा फॅशन व्यवसाय हा मास मार्केटच्या विक्रीवर अवलंबून आहे.

## १०.२ फॅशन डिझायनिंग मधील महत्त्वपूर्ण संज्ञा

१. **फॅशन डिझायनर** – तो किंवा ती कपड्यांची कल्पना करतो आणि रूपांतरीत करतो. हे डिझाइनचे रेखाटन (स्केच) म्हणून ओळखले जाते.


२. **पॅटर्न मेकर** – पॅटर्न मास्टर म्हणून देखील ओळखला जातो. तो किंवा ती कपड्याच्या तुकड्यांचे आकार आणि आकारमान तयार करतो. हे कागद, टेप, व कात्रीच्या सहाय्याने हाताने किंवा संगणक वापरुन केले जाऊ शकते. काही वेळा प्रत्यक्ष कापड मॅनेक्विनवर गुंडाळले जाते.

३. **टेलर** – ग्राहकांच्या डिझाईननुसार त्यांच्या मापास अनुकूल कपडे बनवितात.

४. **स्टायलिस्ट** – तो किंवा ती फॅशन शो किंवा फोटो शूटमधील कपडे, दागिने व पोषाखा बरोबर वापरण्यात येणाऱ्या अन्य वस्तूंमध्ये समन्वय साधतो. ग्राहकांच्या कपड्यांच्या संग्रहासाठी वैयक्तिक ग्राहकाबरोबर काम करतो.

५. **इलस्ट्रेटर** – व्यावसायिक वापरासाठी कपड्यांचे डिझाइन काढतात व हे रंगवितात.

६. **क्रोकि** – क्रोक्वीस हा शब्द फ्रेंचमधून आला आहे. याचा अर्थ फक्त "स्केच" असा आहे. फॅशनमध्ये, हा शब्द एखाद्या आकृतीचे जलद रेखाटन या संदर्भात वापरतात. फॅशन रेखाटनासाठी शरीराचे नऊ समान भागात विभाजन करतात. फॅशन रेखाटनासाठी हे प्रमाणबद्ध मानतात.



चित्र क्र. १०.१ क्रोकि

७. **लुक बुक** – डिझाइनरच्या नजिकच्या भविष्यकाळात प्रदर्शित होणारा चित्र रेखाटनांचा संग्रह.

८. **शैली** – सुस्पष्ट गुणवैशिष्ट्ये नेमकेपणाने विशद केलेले विशिष्ट डिझाईन, आकार किंवा पेहेरावाच्या कपड्यांचा प्रकार. उदा. ए-लाइन स्कर्ट, बर्म्युडा शॉर्ट्स किंवा वेस्टर्न शर्ट.

९. **फॅड**– तात्पुरती, अल्पकालीन फॅशन ही अत्यंत अल्प काळ टिकते.

१०. **क्लासिक** – कपड्यांचा प्रकार जो फॅशन बदलली तरीही लोकप्रिय राहतो. उदा. लहान काळा ड्रेस, साड्या.

११. **गारमेंट**:–पोशाखातील एक कपडा. उदा. एक ड्रेस, सूट, कोट किंवा स्वेटर.

१२. **सिलॉउट** – कपड्यांच्या शैलीची रेखाकृती यात गळ्याची लांबी-रुंदी, बाही, कमररेषा व पँट किंवा स्कर्टच्या यांच्या सहाय्याने दर्शविलेले असतात.

१३. **फिट** – ही संज्ञा परिधान केलेल्या व्यक्तीवर कपडा किती घट्ट किंवा किती सैल बसला आहे या संदर्भात वापरतात.

१४. **कॅड (CAD):** कॉम्प्युटर एडेड ड्राफ्टींग.

१५. **बुटीक** – अद्ययावत कपडे, दागदागिने किंवा अन्य उंची कपड्यांची विक्री करणारे लहान दुकान.

१६. **ॲक्सेसरीज** – पोषाखास पूरक घटक उदा. दागिने, पर्स यासारख्या पोषाखास साजेशा वस्तू ज्यामुळे पेहेरावाला पूर्तता प्राप्त होते. तसेच परिधान करणारी व्यक्ती आकर्षक दिसते.

१७. **मॅनेक्वीन** – 'मॅनेक्वीन' ही प्रतिआकृती असून शिंपी, टेलर्स, ड्रेस डिझायनर इ. चे सादरीकरण किंवा हे कपडे योग्य आकाराचे बनविण्यासाठी याचा उपयोग करतात.

फॅशन ॲक्सेसरीजचे दोन सर्वसाधारण गटात विभाजन करतात.१) बरोबर घेऊन जाता येणाऱ्या २) अंगावर परिधान करण्यात येणाऱ्या. पुढील तक्त्यात दोन्ही गटांत येणाऱ्या घटकांची यादी देण्यात आली आहे. –

**तक्ता क्र. १०.१**
**फॅशन ॲक्सेसरीज**

| बरोबर घेऊन जाता येणाऱ्या ॲक्सेसरीज | अंगावर परिधान करण्यात येणाऱ्या ॲक्सेसरीज |
|---|---|
| पर्स, हँडबॅग्ज, गॉगल, चष्मा, छोटे हातातील पंखे, वॉलीट(छोटे घडीचे पाकीट), काठी/छडी, समारंभातील तलवार इ. | जॅकीटे, बूट, शूज, चपला, टाय, हॅट, पट्टे, हातमोजे, मफलर, दागिने, पिन, घड्याळ, मोजे, शाल, स्कार्फ, रूमाल, स्टॉकिंग्ज, सॅश इ. |

## १०.३ फॅशन रेखाटन(इलस्ट्रेशन)

**फॅशन रेखाटन म्हणजे दृश्य स्वरूपात फॅशनच्या कल्पना पोचवण्याची कला.**

यामध्ये चित्रकला, रंगविणे आणि रेखाटन यांचा समावेश होतो. कल्पना कागदावर किंवा संगणकावर ठेवण्यासाठी केली जाते. हे फार महत्वाचे आहे कारण डिझाइनचे तपशील वस्तुत: कापडे न शिवता करता येतात. बाजूच्या चौकटीत दाखवल्याप्रमाणे अनेक मार्गांनी रेखाटने दिली जाऊ शकतात.

**रेखांटनाचे प्रकार –**

- *पेन्सिल रेखाटन*
- कोळशाचे रेखाटन
- *वॉटर कलर* रेखाटन
- *कोलाज* रेखाटन
- *पेन व शाई* रेखाटन
- *ॲक्रिलिक* रेखाटन

**रेखाटनातील बदल (Variations in Illustration) :** रेखाटनात किंवा कपड्याच्या वेगवेगळ्या भागांमध्ये असंख्य बदल करता येतात. वेगवेगळे डिझाईन काहीतरी नवीन व एकमेव डिझाईन तयार करण्यासाठी त्यांची कल्पनाशक्ती वापरतात. पण काही ठराविक प्रकारचे कपडे किंवा कपड्यांच्या काही भागांचे प्रकार वर्षानुवर्षे लोकप्रिय आहेत.गळा, बाही, कपड्याचा कमरेच्या वरील भाग(बॉडीस्) व स्कर्ट यांच्या आकारात बदल करून विविधता आणता येते. –

**अ. गळ्याच्या आकारातील बदल : काही लोकप्रिय गळ्याचे प्रकार पुढे दिले आहेत –**


*१. ***गोल गळा*** – हा शर्टमधे तसेच बहुतांश कुडते किंवा टॉप यात आढळणारा सर्वात साधा व पारंपरिक गळ्याचा प्रकार आहे. गळ्याची खोली कमी किंवा जास्त करता येते.

*२. ***चौकोनी गळा*** – हा समोरील बाजूने चौरस असतो. फ्रॉक, टॉप, कुर्ती या सारख्या कपड्यांमध्ये हा गळा चांगला दिसतो.

*३. ***व्ही गळा*** – नावाप्रमाणे हा गळा इंग्रजी व्ही अक्षराच्या आकाराप्रमाणे असतो. याची खोली वेगवेगळी असू शकते. टी शर्ट, कुर्ती, टॉपमधे हा गळा आढळतो.

**✻४. बोट नेक** – या गळ्याचा आकार बोटीच्या आकारा सारखा आहे. म्हणून त्याला बोट नेक हे नाव दिले आहे. हा गळ्याचा प्रकार सध्या जास्त प्रचलित आहे. लहान मुलांच्या व स्त्रियांच्या कपड्यांमध्ये हा गळा चांगला दिसतो.

**✻५. ज्यूअल गळा** – हा एक बंद गळा आहे. हा मानेच्या भोवती लागून असतो.




चित्र क्र. १०.२ गळ्यांचे प्रकार

**ब. बाहीमधील बदल : बाहीचे पुढीलप्रमाणे वेगवेगळे प्रकार आहेत –**


**✻१. *साधी बाही*** – ही बहुतेक ड्रेस, साडी ब्लाउज, टी शर्ट यामध्ये नेहमी आढळणारी बाही आहे. ही अंगावर घट्ट किंवा सैल बसणारी असते. या बाहीची लांबी आखूड, ३/४, पूर्णलांब अशी वेगवेगळी असू शकते.

**✻२. *फुग्याची बाही किंवा पफ स्लिव्ह*** – ही बाही वरच्या भागात फुगीर असते व खालच्या बाजूकडे पट्टी जोडलेली असते (कफ).

**✻३. *रॅग्लन बाही*** – ही बाही मुंढ्यापासून गळ्यापर्यंत तिरकी शिवलेली असते. हा बाहीचा प्रकार मुख्यत्वे स्वेटरमधे आढळतो.

**✻४. *कॅप बाही*** – ही बाही हाताची फक्त वरची बाजू झाकते.

**✻५. *बेल बाही*** – ही बाही खालच्या बाजूकडे खूप रूंद किंवा घेरदार असते.




चित्र क्र. १०.३ बाहीचे प्रकार

**क. बॉडिसमधील बदल : बॉडिस् म्हणजे कपड्यातील कमरेच्या वरचा भाग. त्याचे विविध प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.–**

**✻१. *अप्रमाणबद्ध टॉप किंवा कुडता*** – टॉपची खालची बाजू प्रमाणबद्ध नसते.

**✻२. *पोंचो*** – हा टॉप सैल झग्याप्रमाणे असतो. किंवा अंगावर घ्यायच्या वस्त्राप्रमाणे असतो. याला वरच्या बाजूला फक्त एक फट असते ज्यातून डोके बाहेर काढता येते. यात स्पष्ट किंवा निश्चित असा बॉडिसचा भाग किंवा बाही नसते.

**✻३. प्रिंसेस लाईन बॉडिस** – तीन उभे भाग जोडून हा टॉप बनवतात.

**✻४. *शर्ट*** – कॉलर व पूर्ण लांब बाही असलेला शर्ट हा नेहमी आढळणारा प्रकार आहे.

**✻५. *टी शर्ट*** – बहुतांशपणे निटेड कापडाचे बनवलेले असतात. याची लांबी, बाही व गळा यात फरक करता येतो.




चित्र क्र. १०.४ बॉडिसमधील बदल / बॉडिस्‌चे प्रकार

**ड. स्कर्ट मधील बदल :** स्कर्ट विविध प्रकारे तयार करता येतात. –


✻१. **ए लाईन स्कर्ट** – हा कमरेजवळ घट्ट बसणारा व खाली रूंद होत जाणारा स्कर्ट आहे.

✻२. **ब्रुमास्टिक स्कर्ट** – लांब स्कर्ट किंवा मॅक्सी स्कर्ट या प्रकारात येतात.

✻३. **लेअर्ड स्कर्ट** – या स्कर्टला अर्धा, ३/४ किंवा पूर्ण लांबीचे तीन किंवा जास्त थर असतात.

✻४. **पेन्सील स्कर्ट** – हा सरळ स्कर्ट असून घट्ट बसतो. औपचारिक कपड्यांसाठी सुयोग्य आहे.

✻५. **प्लिटेड्‌ स्कर्ट** – या स्कर्टला नेहमीच्या साईड प्लिट्‌स किंवा बॉक्सप्लिट्‌स घातलेल्या असतात. शालेय गणवेशांसाठी बहुतांशपणे वापरतात.





चित्र क्र. १०.५ स्कर्टचे प्रकार

चांगले डिझाईन तयार करण्यास काही मुलभूत घटकांचा उपयोग करावा लागतो. हे घटक दोन मूख्य गटात विभागले जातात. –

१. कलेचे घटक  २. डिझाईनची तत्त्वे

## १०.४ कलेचे घटक

कोणतीही कलाकृती किंवा डिझाइन निर्माण करण्यास आवश्यक असणारे हे मूलभूत घटक आहेत. यांच्या उपयोगाशिवाय डिझाइन निर्माण करता येत नाही. हे घटक पुढीलप्रमाणे अहेत. :




तक्ता क्र. १०.२ कलेचे घटक

१. **रेषा :** एकमेकांना जोडलेल्या अनेक बिंदूंच्या साखळीला रेषा म्हणतात. डिझाइन तयार करताना रेषा हा घटक महत्त्वाचा आहे. रेषेचे चार प्रकार आहेत. –

अ. **उभ्या रेषा :** या रेषांमुळे डोळ्यांची वर व खाली अशी हालचाल होते. त्यामूळे उभ्या रेषा उंचीची आणि मोहक लावण्याची जाणीव निर्माण करतात. या रेषांमुळे उंच, सडपातळ शरीराचा दृष्य आभास निर्माण होतो. तसेच यामुळे ताकद, प्रतिष्ठा, सावधानता दर्शवली जाते. या औपचारिक दिसतात.



चित्र क्र. १०.६ उभ्या रेषेचे परिणाम

ब. **आडव्या रेषा :** या कपड्यावर आडव्या दिशेत असतात. त्यामुळे डोळ्यांना शरीराच्या रूंदीची जाणीव होते. आडव्या रेषांचे डिझाइन असलेले कपडे घातलेली व्यक्ती बुटकी व लठ्ठ भासते. आडव्या रेषांमुळे स्थिरता, शांतता हे भाव निर्माण होतात.



चित्र क्र. १०.७ आडव्या रेषेचे परिणाम

क. **तिरक्या रेषा :** उभ्या रेषा व आडव्या रेषा यांच्या मधल्या दिशेतून तिरक्या रेषा असतात. त्यांच्यामुळे अस्वस्थता व अस्थिरता हे भास निर्माण होतात. यामधून हालचाल किंवा सक्रियतेचे भावही निर्माण होतात. या रेषांचे डिझाईन जास्त अद्ययावत मानतात. ही डिझाइन सर्वात जास्त फॅशन असलेल्या(हाय फॅशन) कपड्यांमध्ये दिसून येते.



चित्र क्र. १०.८ तिरक्या रेषांचे परिणाम.

ड. **वक्राकार रेषा :** या रेषा कपड्यामध्ये सौम्यपणा किंवा स्त्रीत्व, वर्तुळाकार दर्शवतात. सर्वसाधारणपणे या रेषांचा उपयोग स्त्रियांसाठी कपडे तयार करताना होतो. पुरुषांच्या कपड्यांमधे ही अनौपचारिक परिणाम साध्य करण्यास वर्तुळाकार रेषांचा कलात्मकतेने उपयोग करता येतो.



चित्र क्र. १०.९ वक्राकार रेषांचे परिणाम

२. **आकार :** आकार निर्माण करणे हे रेषांचे प्रमुख कार्य आहे. फॅशन व्यवसायात, ***सिलहाऊट*** संज्ञा

सर्वसाधारणपणे कपड्याच्या आकाराचे वर्णन करण्यासाठी वापरतात. हा फ्रेंच शब्द असून त्याचा अर्थ पोषाखाची सर्वसाधारण बाह्य आकृती किंवा आकार असा आहे.



चित्र क्र. १०.१० सिलॉउट

३. **पोत :** एखाद्या वस्तूच्या पृष्ठभागाचा गुणधर्म हणजे पोत. फॅशन डिझाइनिंग मधे कापडाची वीण आणि कापडाच्या पृष्ठभागावरून परावर्तित होणारा प्रकाश यामुळे कापडातील पोत निर्माण होतो. पोत हे दृक पोत किंवा स्पर्शजन्य असतात. दृक् पोतामुळे एखादे कापड बघितल्यानंतर मंद किंवा चमकदार दिसते. स्पर्शजन्य पोतामुळे आपल्याला स्पर्श केल्यावर कापड गुळगुळीत आहे का खरखरीत आहे ते समजते. स्त्रियांसाठी नाजूक कपडे बनवण्यास शिफॉनचे कापड योग्य असते तर डेनिम सारखे घट्ट विणलेले, जाड कापड अनौपचारिक कपड्यांसाठी सुयोग्य असते.



चित्र क्र. १०.११ पोत

४. **आकृतीबंध :** आकृतीबंध म्हणजे पृष्ठभागाचे सुशोभन त्यामुळे रुची आणि जिवंतपणा निर्माण होतो.


चित्राच्या (motifs) माध्यमातून आकृतीबंध निर्माण करतात. त्याचे प्रकार पुढीलप्रमाणे

अ. *नैसर्गिक* – फुले, पाने, प्राणी, पक्षी इत्यादी.

ब. *अलंकारीक* – नैसर्गिक घटकांवर आधारित असतात परंतु काही काल्पनिक बदल करतात.

क. *भौमितिक* – वर्तुळ, बिंदू, त्रिकोण, चौकटी, पट्टे इत्यादि.

ड. *अमूर्त* – माहित असलेल्या कोणत्याही घटकाशी साम्य नसते व आपल्याला समजण्यास कठीण असतात.




चित्र क्र. १०.१२ आकृतीबंध

५. **रंग :** कोणाचेही लक्ष वेधून होणारा रंग हा सर्वात पहिला घटक आहे. त्यामुळे फॅशन डिझाईनिंगमध्ये रंग महत्त्वाचा आहे. डिझाइनच्या रंगाकडे सर्वप्रथम लक्ष दिले जाते. कपडा आवडेल किंवा नाही यावर रंगाचा परिणाम होतो. रंगासंबंधी काही संज्ञा आपल्याला माहित असणे आवश्यक आहे.

१. *रंगनाम(ह्यू)* – रंगनाम म्हणजे रंगाचे नाव जसे लाल,निळा, पिवळा इत्यादी.

२. *रंगमूल्य (व्हॅल्यू)* – रंगाचा उजळपणा किंवा गडदपणा म्हणजे रंगमूल्य.

३. *रंगकांती (इन्टेन्सिटी)* – रंगाचा तेजस्वीपणा किंवा मंदपणा म्हणजे रंगकांती.

४. *प्राथमिक रंग* – तीन प्राथमिक रंग आहेत, लाल, निळा, पिवळा.

५. *दुय्यम रंग* – –दोन प्राथमिक रंगांच्या मिश्रणातून दुय्यम रंग तयार होतात. हिरवा, नारिंगी व जांभळा हे तीन दुय्यम रंग आहेत.

६. ***माध्यमिक रंग –*** प्राथमिक रंग व त्याच्या जवळचा दुय्यम रंग यांच्यामधे असणाऱ्या रंगांना माध्यमिक रंग म्हणतात.उदा. निळसर हिरवा, लालसर नारिंगी, इत्यादी.

७. ***रंगचक्र (कलर व्हील) –*** सर्व प्राथमिक, दुय्यम व माध्यमिक रंग रंगचक्रात दर्शवलेले असतात. रंगसंगती निवडताना याची मदत होते.



चित्र क्र. १०.१३ रंगचक्र

**काही गमतीशीर माहिती !**

दर्जा किंवा व्यवसाय सुचविण्यास बरेचदा रंगाचा उपयोग करतात. सोनेरी पिवळा व जांभळा रंग नेहमी खानदानी समजला जात असे. काळ्या रंगाचा कोट णकील तर डॉक्टर पांढरा (लॅब) कोट वापरतात.

रंगाला धार्मिक व सांस्कृतीक महत्त्वही आहे. उदा. आपल्याकडील काही संस्कृतीत नवरी लाल रंगाचे वस्त्र परिधान करते तर पाश्चिमात्य संस्कृतीत पांढऱ्या रंगाचे असते.

**रंगसंगती(कलर स्कीम) :** डिजाइन तयार करताना विविध रंग एकत्रित वापरतात. काही मुख्य रंगसंगतीचे प्रकार पुढे दिले आहेत. –


अ. एकरंगीय रंगसंगती (मोनोक्रोमॅटिक रंगसंगती) – यात केवळ एक रंग वापरतात. एकाच रंगाची विविध रंगमूल्ये वापरून सौंदर्यपूर्ण परिणाम निर्माण करतात.

ब. संबंधित किंवा समीप रंगसंगती (ॲनलॉगस रंगसंगती)– या रंगसंगतीमध्ये रंगचक्रातील एकमेकांजवळचे रंग वापरतात. उदा. निळा आणि निळसर हिरवा, पिवळा आणि पिवळसर नारिंगी इत्यादी.

क. विरोधी रंगसंगती (कॉम्प्लीमेंटरी रंगसंगती)– रंग चक्रातील रंगाच्या परस्पर विरोधी रंग या रंगसंगतीत वापरतात. उदा. निळा आणि नारिंगी, पिवळा आणि जांभळा इत्यदी.

ड. त्रिरंग रंगसंगती (ट्रायड रंगसंगती)–रंगचक्रावरील एकमेकांपासून समान अंतरावर असणारे तीन रंग यात वापरण्यात येतात. उदा. पिवळा, लाल आणि निळा.

इ. तटस्थ रंगसंगती (न्यूट्रल रंगसंगती)–या रंगसंगतीमधे करडा (ग्रे) किंवा चॉकलेटी (ब्राऊन) मुख्य रंग वापरतात.


| एकरंगीय | संबंधित/समीप | विरोधी |
| --- | --- | --- |
|  |  |  |
| त्रिरंग | तटस्थ | |
|  |  | |

तक्ता क्र. १०.३ रंगसंगती

## १०.५ डिझाइनची तत्त्वे

डिझाइन निर्माण करण्यास उपयुक्त असणाऱ्या कलेच्या घटकांव्यतिरिक्त अशी काही तत्वे आहेत, ज्यांचा वापर केल्यास सुंदर व आकर्षक डिझाइन तयार होते. ही तत्वे पुढील प्रमाणे आहेत –

१. **प्रमाणबद्धता :** फॅशन डिझाइनिंगमधे प्रमाणबद्धता म्हणजे आकारमानातील सहसंबंध. कपड्यातील विविध भागांच्या आकारमानांचा एकमेकांशी किंवा संपूर्ण डिझाइनशी असलेला संबंध म्हणजे प्रमाणबद्धता. डिझाइनमधील प्रमाणबद्धता योग्य असेल तर डिझाइनचा परिणाम डोळ्यांना सुखकारक असतो. उदा. कपड्यातील वरचा भाग व खालचा भाग याची एकमेकांशी असलेले प्रमाण, उत्तम प्रमाबद्धतेसाठी ५:८, ८:१३ हे सुवर्णलंब गुणोत्तर प्रमाण योग्य समजतात.




चित्र क्र. १०.१४ प्रमाणबद्धता

२. **तोल :** तोल म्हणजे आकाराच्या अंतर्गत भागांची एकत्रित मिळतीजुळती मांडणी. डिझाइन मधील **दृष्य वजन** याअर्थानेही तोल ही संज्ञा वापरतात. कपडा चांगला दिसण्यासाठी कपड्याच्या मध्यभागाच्या दोन्ही बाजूंना समान वजन असावे लागते. तोलाचे समतोल किंवा विषमतोल असे प्रकार आहेत. समतोलाला औपचारिक तोल असेही म्हणतात. या प्रकारात कपड्याची डावी व उजवी बाजू सारखीच दिसते. औपचारिक तोल असलेल्या कपड्यातील डाव्या व उजव्या बाजूच्या सारख्या ठिकाणचे तपशील पूर्णतया एकसारखे असतात. उदा. दोन बाजूचे दोन खिसे. हे करता येणे सोपे असते व त्यामुळे समतोल साधता येतो.

विषमतोलाला अनौपचारिक तोल असेही म्हणतात. यात कपड्यामध्ये मध्यभागाच्या दोन्ही बाजूंना असणारे डिझाइनचे तपशील असमान असतात. एका बाजूला असणाऱ्या लक्षवेधी तपशीलाचा तोल दुसऱ्या बाजूच्या मोठ्या परंतु कमी लक्षवेधी तपशीलाच्या मदतीने साधता येतो. हा साध्य करणे अवघड असते. त्यासाठी जास्त सर्जनशीलता असावी लागते. हा तोल योग्य प्रकारानी साध्य केल्यास जरी दोन्ही बाजू असमान असल्या तरी त्यात तोल दिसून येतो. चांगल्या प्रकारचा अनौपचारिक तोल फार सुंदर व खास दिसतो.



चित्र क्र १०.१५ औपचारिक तोल



चित्र क्र.१०.१६ अनौपचारिक तोल

३. **लय :** फॅशन डिझाइनिंगमधे रेषा, आकार, पोत आणि रंग यांच्या पुनरावृत्तीने कपड्यामध्ये लय साधता येते. कपड्याच्या एका भागाकडून

दुसऱ्या भागाकडे दृष्टीची हलुवार हालचाल होते. उदा. – स्कर्टला असणाऱ्या, प्लेट्स किंवा अनेक थरांचा स्कर्ट. आकारमानात हळूहळू मोठे केल्यानेही लय निर्माण होते.



चित्र क्र.१०.१७ लय

४. **प्राधान्य :** प्राधान्य म्हणजे असे तत्त्व ज्यामुळे कपड्यातील सर्वात महत्त्वाच्या भागाकडे सर्वप्रथम लक्ष वेधले जाईल. हा लक्षवेधी भाग कड्याच्या इतर भागापेक्षा जास्त आकर्षक असावा लागतो परंतु त्याचवेळी कपड्याच्या सर्वसाधारण डिझाइनशी संबंधित असवा लागतो. चांगले प्राधान्य असल्यास कपड्याच्या महत्त्वाच्या भागाकडे लगेच दृष्टी वेधली जाते.उदा अगदी साध्या ड्रेसवर मोठा बो (bow) लावणे.



चित्र क्र. १०.१८ प्राधान्य

५. **परस्परविरोध (कॉन्ट्रास्ट) :** वेगवेगळे रंग, पोत आकार वापरणे. हे डिझाइनचे अती शक्तिशाली तत्त्व आहे. परस्परविरोध वापरून एकसारखेपणामुळे आलेली निरसता कंटाळवाणेपणा नाहीसा होतो.



चित्र क्र. १०.१९ परस्परविरोध

६. **सुसंगती :** कलेचे घटक ज्यावेळी डिझाइनच्या तत्त्वांबरोबर वापरली जातात त्यावेळी सुसंगती निर्माण होते. कपड्याच्या सर्व भागांची चांगली मांडणी म्हणजे सुसंगती. याचा अर्थ रंग, पोत, पॅटर्न यांच्या वापरामध्ये मिळतेजुळतेपणा किंवा सारखेपणा यामुळे डोळ्यांना सुखकारक परिणाम साध्य होतो.



चित्र क्र. १०.२० सुसंगती

## १०.६ फॅशन डिझाइनिगची व्याप्ती

अलिकडच्या काळातील तांत्रिक प्रगतीमुळे जग जवळ आहे. जगाच्या कुठल्याही कोपऱ्यातील बातमी किंवा माहिती एक क्षणात आपल्यापर्यंत पोहोचू शकते. आंतरजाल किंवा इंटरनेटमुळे जगाच्या इतर भागात फॅशनची नवीन प्रथा म्हणजेच ट्रेंड काय आहे हे आपल्याला समजू शकते. यामुळे आपल्यामध्ये विशेषतः तरूणांमध्ये फॅशनबद्दल जाणीव निर्माण झाली आहे. कपडे व पूरक घटकांवर (ॲक्सेसरीज) आपण सर्व आपल्या वडीलधाऱ्यांपेक्षा खूप जास्त खर्च करतो. भारतात फॅशनमधे नवीन ट्रेंडचा शोध लावण्यासाठी कुशल असणारी फार मोठी लोकसंख्या आहे. त्यामुळे भारत हि विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय तसेच स्थानिक ब्रँडसाठी नवीन बाजारपेठ आहे. फॅशन डिझाइनिंगची व्याप्ती प्रचंड आहे व जागतिकीकरणाने याचा अधिक विस्तार होणार आहे.

आज मुले व मुलीही फॅशन डिझाइनिंगची निवड आपल्या करीअरसाठी बरोबरीने करतात. देशभरात विविध शासकीय, निमशासकीय व खासगी पदवी व पदविका अभ्यासक्रम उपलब्ध आहे. इथे फॅशन डिझाइनिंग शिकण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. तसेच या क्षेत्रात नोकरीच्याही भरपूर संधी आहेत. प्रशिक्षित व्यक्ती, एखाद्या फॅशन हाऊस रेडिमेड कपडे बनवणाऱ्या कारखान्यात किंवा बुटिकमध्ये काम करू शकते. तसेच स्वतःचे बुटिक सुरू करू शकतात किंवा स्वतंत्ररित्या काम करू शकतात. ज्या स्त्रिया घराबाहेर पडून एखाद्या ठिकाणी ठराविक तास काम करू शकत नाहीत अशा स्त्रियांना व्यवसायासाठी हा उत्तम पर्याय आहे. फॅशन डिझाइनिंगमुळे त्यांना घरात राहून काम करण्याची सोयी उपलब्ध होते.

### आदर्श फॅशन डिझायनर साठी आवश्यक गुणवत्ता :

१. सर्जनशील आणि कलासक्त मन.

२. संगणकाचे युग असले तरी चांगली चित्रकलेची कौशल्ये.

३. रंग व त्याचे परिणाम याबाबत समज.

४. कपडे व त्यांचे प्रकार यांचे चालू काळातील ज्ञान.

५. स्वतःच्या कल्पना चित्र किंवा रेखाटनांच्या माध्यमातून दृश्य स्वरूपात व्यक्त करण्याची क्षमता.

६. फॅशन उद्योग व त्यातील नवीनतम ट्रेंड याविषयी माहिती.

७. फॅशन बाजारपेठेतील आवश्यकता यांचा अंदाज घेण्याची क्षमता.

८. कपडे शिवण्याचे ज्ञान.



### तुमची बौद्धिक क्षमता वापरा :

१. **दिलेले शब्द वापरून खालील परिच्छेद पूर्ण करा. :**

(समतोलता, दृष्य वजन, सुंदर व आकर्षक, सुवर्णलंब गुणोत्तर, आकारमानांचा संबंध )

अशी काही तत्वे आहेत ज्यांचा वापर केल्यास .. ........................................................................डिझाइन तयार होते. कपड्यातील विविध भागांच्या ...................................................................................म्हणजे प्रमाणबद्धता. कपड्यातील वरचा भाग व खालचा भाग यांचे ... ............................................................................ प्रमाण ५:८ आहे, डिझाईनमधील ...................................................या अर्थानेही तोल ही संज्ञा वापरतात. ..................................... औपचारिक तोल असेही म्हणतात.

## स्वाध्याय

### वस्तूनिष्ठ प्रश्न

१. जोड्या लावा :

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| १. | क्रोकि | अ. | फॅड |
| २. | बुटीक | ब. | रंगाचे नाव |
| ३. | सिलॉउट | क. | मानवी आकृतीचे रेखाटन |
| ४. | लय | ड. | एक फॅशन शॉप |
| ५. | रंगनाम | ई. | रेषांची पुनरावृत्ती |
| | | फ. | कपड्यांची रेखाकृती |

२. प्रत्येक प्रश्नांसाठी दिलेल्या विकल्पांमधून सर्वात योग्य उत्तर निवडा आणि लिहा. :

१. मध्यभागाच्या दोन्ही बाजूंचे समान वजन.
अ. औपचारिक तोल
ब. अनौपचारिक तोल
क. प्राधान्य

२. एक रंग वापरून रंगसंगती.
अ. समीप ब. एकरंगीय
क. तटस्थ

३. रेषा ज्या उंचीचा आभास देतात.
अ. उभ्या ब. आडव्या
क. तिरक्या

४. कपड्यांसह परिधान केलेल्या किंवा बरोबर घेतलेल्या वस्तू.
अ. क्रोकि ब. ॲक्सेसरीज
क. लुक बूक

५. सर्वसामान्य लोकांसाठी तयार केलेले कपडे.
अ. हॉटे कॉचर ब. रेडी टू वेअर
क. मास मार्केट

३. खाली दिलेल्या जोड्या दरम्यान परस्पर संबंध सांगा.:( उदा.– बोट नेक : नेकलाईन गळा)

१. रँगलन :
______________

२. पोंचो :
______________

३. ए–लाईन :
______________

४. एंजल :
______________

५. स्वीट हार्ट :
______________

४. वेगळे शोधा :

१. अ. लाल ब. निळा
क. नारिंगी ड. पिवळा

२. अ. त्रिरंग ब. लय
क. तटस्थ ड. समीप

३. अ. रेषा ब. तोल
क. आकार ड. पोत

४. अ. प्रमाणबध्दता ब. प्राधान्य
क. रंग ड. लय

५. अ. हॅटस ब. बेल्ट
क. हॅन्डबॅग ड. स्कर्ट

### लघुत्तरी प्रश्न

१. चूक किंवा बरोबर ते सकारण लिहा. :

१. हॉट कॉचर खूपच महाग आहे.
२. रेखाटन म्हणजे कपड्याची बाह्यरेषा.

३. औपचारिक तोल मिळविणे सोपे आहे.

४. विरोधी रंगसंगतीत फक्त एक रंग वापरतात.

५. रंगचक्रातील एकमेकांजवळचे रंग म्हणजे माध्यमिक रंग.

## २. पुढील घटकांची दोन उदाहरणे द्या. :

१. गळ्यांचे प्रकार.

२. डिझाईनची तत्वे

३. स्कर्टचे प्रकार.

४. रेषांचे प्रकार

५. दुय्यम रंग

## ३. व्याख्या लिहा. :

१. फॅशन

२. सुसंगती

३. रेखाटन

४. बुटिक

५. पोत

## ४. थोडक्यात लिहा.:

१. लय

२. प्रमाणबध्दता

३. फॅशन ॲक्सेसरीज

४. परस्पर विरोध

५. रेषा – कलेचा घटक

## दीर्घोत्तरी प्रश्न

१. रेखाटनाचे महत्त्व स्पष्ट करा.

२. कोणत्याही तीन रंगसंगतीचे वर्णन करा.

३. डिझाईनची कोणतीही तीन तत्वे स्पष्ट करा.

४. आदर्श फॅशन डिझायनरची गुणवत्ता कोणती असावी ते लिहा.

५. कोणत्याही तीन कलेच्या घटकांबद्दल माहिती लिहा.

## प्रकल्प / क्षेत्र भेट

१. फॅशन हाऊसला भेट द्या आणि तिथे चालणाऱ्या उपक्रमांची नोंद करा.

२. कपड्यातील विविध भागांच्या बदलांचा/ रंगसंगतींचा पोर्टफोलिओ तयार करा .

३. फॅशन बाजारपेठेतील सध्याचे नवीनतम ट्रेंड्सचा शोध घ्या.